
■ अहिल्यानगर ■ शुक्रवार, दि. ९ मे २०२५ ■ वर्ष ६ वे ■ अंक २८ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145

प्रत्यूत्तरादाखल भारताने लाहोरवर ड्रोन हल्ला केला




॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

www.veerbhuminews.com


# भारताकडून नापाक मनसुबे नेस्तनाबूत

## पाकचे ड्रोन हल्ले हवेतच परतवले | भारताचा पाकिस्तानात घुसून क्षेपणास्त्र वर्षाव

**● नवी दिल्ली । वीरभूमी–**

पाकिस्तानने भारताविरुद्ध आधी नियंत्रण रेषेवर गोळीबार आणि जम्मूसह पंजाब, राजस्थानातही ड्रोन हल्ले करीत आपल्या कुरापती सुरू ठेवल्याने अखेर भारताने पाकिस्तानवर हल्ला केला. त्यामुळे भारत–पाकिस्तान युद्धाला सुरुवात झाली आहे. क्षेपणास्त्र आणि ड्रोन हल्ले सुरू करण्यात आले. त्यामुळे पाकिस्तानने अख्ख्या पाकिस्तानात ब्लॅकआऊट जारी केला. भारतानेही सीमावर्ती भागात ब्लॅकआऊट केला आहे. पंजाब, अंबाला, राजस्थान आणि हरियाणातील गावांना ब्लॅक आऊट करण्यास सांगितले. तसेच सायरन वाजताच प्रतिसाद देऊन ब्लॅकआऊट करण्याचे आदेश देण्यात आले.

भारताच्या ऑपरेशन सिंदूरनंतर पाकिस्तानने अचानक भारतावर हल्ले सुरू केले. गुरुवारी अंधार पडताच पाकिस्तानने सीमेनजीकच्या भारतातील विविध शहरांमध्ये १०० हून अधिक क्षेपणास्त्रे डागली. एकट्या राजस्थानमधील जैसलमेरमध्ये ७० पेक्षा जास्त क्षेपणास्त्रांचा मारा केला. मात्र, भारताच्या हवाई संरक्षण यंत्रणेने पाकिस्तानची सर्व क्षेपणास्त्रे हवेतच हाणून पाडली. त्यानंतर भारताने प्रत्युत्तर लाहोरमधील पाकिस्तानचे एअरबोर्न वॉर्निंग अँड कंट्रोल (अवॉक्स) नष्ट केले. तसेच फैसलाबाद, सरगोधा, मुलतान आणि सियालकोट शहरांतील संरक्षण प्रणालीही नष्ट केली. जम्मू, पंजाब, राजस्थानमध्ये केलेल्या हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून भारताने पाकिस्तानवर हल्ला चढविला.

पाकिस्तानाने सीमा ओलांडून केलेल्या ड्रोन हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानातील १६ शहरांवर मोठे हवाई हल्ले केले. राजधानी इस्लामाबादसह सियालकोट, बहावलपूर, लाहोर, कराची आणि रावळपिंडीसारख्या प्रमुख शहरांना भारताने लक्ष्य करीत जोरदार हल्ला चढविला. या हल्ल्यांमुळे पाकमध्ये मोठी खळबळ उडाली. पाकिस्तानच्या कुरापती गुरुवारी दिवसभर सुरु राहिल्या. आधी पाकिस्तानने भारताच्या काही भागांत हल्ला केला होता. त्यामुळे भारताने जशास तसे उत्तर दिले.

पाकिस्तान चांगलाच घाबरला असून भारताने अधिक हल्ला करू नये, म्हणून पाक सरकारने अख्ख्या देशातच ब्लॅकआऊट केले. अचानक उद्भवलेल्या या परिस्थितीमुळे पाकिस्तानी नागरिक प्रचंड हादरले आहेत.

दरम्यान, भारतातील सर्व विमानतळांना सतर्कतेचे आदेश देण्यात आले. भारताच्या तिन्ही सैन्यांना अलर्ट राहण्याचे आदेशही दिले. पाकिस्तानात गुरुवारी रात्री सर्वत्र क्षेपणास्त्र, ड्रोनचा मारा सुरू केला. एकीकडे हवाई हल्ले सुरु झालेले असतानाच समुद्रमार्गेही हल्लाबोल सुरू केला. त्यामुळे पाकिस्तानची घाबरगुंडी उडाली.

### शाळा बंद, सुट्टा रद्द

■ पंजाब, हरियाणा, गुजरात, राजस्थान आणि पश्चिम बंगालने मोठा निर्णय घेतला आहे. या ठिकाणच्या सरकारी अधिकारी, पोलिसांच्या सुट्या रद्द करण्यात आल्या. तसेच या भागातील शाळांना पुढील आदेशापर्यंत सुट्या देण्यात आल्या आहेत.

### ८ हजार ट्विटर अकाऊंट बंद

■ पाकिस्तानकडून युद्धाबाबत चुकीच्या बातम्या पसरवल्या जाऊ नये, चुकीची माहिती दिली जाऊ नये म्हणून भारताने एकूण ८ हजार ट्विटर खाती बंद केली आहेत. पुढील आदेश येईलपर्यंत ही खाती बंद राहणार असल्याचे सूत्रांनी सांगितले.



### पाकिस्तानची ४ विमाने पाडली

■ पाकिस्तानी हवाई दलाने भारतीय हद्दीत घुसून हल्ले करण्याचा प्रयत्न केला. मात्र, भारतीय सैन्याने पाकिस्तानची ४ लढाऊ विमाने पाडली. यामध्ये तीन एफ–१७ आणि एका एफ–१६ लढाऊ विमानांचा समावेश आहे. यापैकी एका विमानातील वैमानिकालाही पकडण्यात आले.

## पाकची ‘एचक्यू-९’ हवाई संरक्षण प्रणाली उद्धवस्त

**● नवी दिल्ली । वीरभूमी–**

भारताने सुरू केलेल्या ‘ऑपरेशन सिंदूर’मध्ये पाकिस्तानचे मोठे नुकसान झाले आहे. भारताने पाकिस्तानच्या हवाई संरक्षण यंत्रणेवर हल्ला करून ती यंत्रणा उद्धस्त केली आहे. यासंदर्भातील माहिती भारताच्या संरक्षण मंत्रालयाने दिली आहे. भारताच्या हल्ल्यांमध्ये क्षेपणास्त्र लाँचर्सचेही मोठे नुकसान झाले आहे. पाकिस्तानला चीनकडून एचक्यू–९ हवाई संरक्षण प्रणाली मिळाली आहे.

पाकिस्तानी लोक चीनच्या ‘एचक्यू–९’ ची तुलना भारताच्या एस–४०० हवाई संरक्षण प्रणालीशी करतात. पण आता भारताने एचक्यू–९ तांत्रिकदृष्ट्या एस–४०० समोर कुठेही टिकत नाही हे दाखवून दिले आहे. ‘एचक्यू–९’ ची रडार प्रणाली भारताच्या ब्राह्मोस सारख्या सुपरसॉनिक क्षेपणास्त्रांना रोखू शकेल अशी जवळजवळ कोणतीही शक्यता नाही. एस–४०० ची मारा क्षमता ४०० किलोमीटर आहे आणि ती खूप कमी वेळात कार्यान्वित होऊ शकते.

### ‘ऑपरेशन सिंदूर’मध्ये एस-४०० ची महत्वाची भूमिका

■ ‘ऑपरेशन सिंदूर’ मध्ये भारतीय हवाई दलाने पाकिस्तान आणि पीओकेमधील दहशतवाद्यांचे अड्डे नष्ट करण्यासाठी हॅमर, स्कॅल्प आणि इतर अचूक शस्त्रांचा वापर केला. या ऑपरेशनमध्येही एस–४०० ने भारतीय हवाई क्षेत्राचे रक्षण करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. शत्रूच्या कोणत्याही प्रतिहल्ल्याला हाणून पाडण्यासाठी ही प्रणाली सज्ज होती, यामुळे भारतीय लढाऊ विमानांना सुरक्षितपणे ऑपरेशन पूर्ण करता आले.




## अचानक बगलिहारसह सलालचे दरवाजे उघडल्याने पाकिस्तानात पूरस्थिती

**● नवी दिल्ली । वीरभूमी–**

भारतातील निष्पाप लोकांचा बळी घेणाऱ्या दहशतवाद्यांना आश्रय देणाऱ्या पाकिस्तानला धडा शिकण्यासाठी भारताने पुन्हा एकदा चिनाबचा आधार घेण्याचा निर्णय घेतला आहे. बगलिहार आणि सलाल धरणाचे दरवाजे गुरूवार दि. ८ मे रोजी उघडण्यात आले आहेत. यामुळे आता पाकिस्तानमधील वेगवेगळ्या भागात पूर सदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे.

सीमावर्ती भागातील त्यांच्या लष्करी कारवायांवरही याचा परिणाम झाला आहे. गेल्या काही दिवसांत भारताने पाकवर पाणी हल्ला करण्याची ही दुसरी वेळ आहे. रविवारी याआधी भारत सरकारने चिनाब नदीच्या पाण्याचा प्रवाह थांबवला होता, ज्यामुळे पाकिस्तानमध्ये दुष्काळाची परिस्थिती निर्माण झाली होती आणि त्यांचे विविध जलविद्युत प्रकल्प बंद करण्यात आले होते. मात्र, भारताने दुसऱ्या दिवशी पाणी सोडले.

ऑपरेशन सिंदूरमुळे निराश झालेल्या पाकिस्तानने मंगळवारी रात्रीपासून भारताच्या सीमावर्ती भागात गोळीबार सुरू केला आहे. या गोळीबारात एक जवान शहीद झाला असून १४ नागरिकांना आपले प्राण गमवावे लागले आहेत.

या हल्ल्यात जवळपास १०० नागरिक जखमी झाले आहेत. संबंधित सूत्रांनी सांगितले की, काल रात्री रियासीच्या दोडा–किश्तवारमध्ये मुसळधार पाऊस पडला. यामुळेच, बगलियार आणि सलाल धरणातील पाण्याचा प्रवाह सुरळीत करण्यासाठी बांधलेले दोन अतिरिक्त दरवाजे उघडण्यात आले आहेत. यामुळे रियासीच्या खाली अखनूरमध्ये पाण्याची पातळी २० फुटांपेक्षा जास्त वाढली आहे.

यामुळे अखनूरच्या खाली असलेल्या पाकिस्तानी भागात पूर परिस्थिती निर्माण झाली आहे. याची अद्याप पुष्टी झालेली नसली तरी, सूत्रांनी सांगितले की चिनाब पाणलोट क्षेत्रात असलेल्या गढखल आणि परगवाल सेक्टरमधील काही पाकिस्तानी चौक्या पाण्याखाली गेल्या आहेत. सिंधू पाणी करारांतर्गत, चिनाब नदीचे पाणी रोखण्यापूर्वी किंवा त्यावर बांधलेल्या धरणांमधून अचानक पाणी सोडण्यापूर्वी पाकिस्तानला माहिती देण्यात येत होती. आता हा करार स्थगित करण्यात आला आहे, त्यामुळे आता त्याची माहिती पाकला दिली जाणार नाही. आता भारत जेव्हा हवे, तेव्हा पाकिस्तानमध्ये दुष्काळ आणि पूर परिस्थिती निर्माण करू शकतो.

## सांबा सीमेवर बीएसएफकडून १० दहशतवाद्यांचा खातमा



**● श्रीनगर । वीरभूमी–**

बुधवारी रात्री जम्मू आणि काश्मीरमधील जम्मू आणि पठाणकोटसह ११ भागात पाकिस्तानने १०० हून अधिक ड्रोन आणि क्षेपणास्त्रांचा वापर केला, परंतु क्षेपणास्त्र संरक्षण प्रणाली एस ४०० आणि आकाशने हा हल्ला उधळून लावला.

प्रत्युत्तरादाखल, बीएसएफ जवानांनी सांबा आंतरराष्ट्रीय सीमेवर १० दहशतवाद्यांना ठार केले. उपराज्यपाल मनोज सिन्हा आज लष्करी कर्मचा–यांना भेटतील आणि मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला जम्मूला पोहोचले आहेत. त्याच वेळी, नियंत्रण रेषेवरील कुपवाडा, उरी, आरएस पुरा, बारामुल्लासह अनेक सेक्टरमध्ये पाकिस्तान सतत गोळीबार आणि गोळीबार करत आहे. अनेक ठिकाणी क्षेपणास्त्रे डागल्याचे वृत्त आहे. या हल्ल्यांमध्ये आतापर्यंत १७ जणांना आपला जीव गमवावा लागला आहे, तर ५० हून अधिक लोक जखमी झाले आहेत. ७ मे च्या रात्री सुरू झालेल्या ऑपरेशन सिंदूरनंतर जम्मू आणि काश्मीरमध्ये हाय अलर्ट जारी करण्यात आला आहे.

काल रात्री, पाकिस्तानने नियंत्रण रेषा आणि आंतरराष्ट्रीय सीमेजवळील अनेक भागात ड्रोन पाठवण्याचा अयशस्वी प्रयत्न केला. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, भारतीय लष्कराच्या हवाई संरक्षण युनिट्सनी मोठी कारवाई करत ५० हून अधिक ड्रोन पाडले. ही कारवाई उधमपूर, सांबा, जम्मू, अखनूर, नगरोटा आणि पठाणकोट येथे झाली. लष्कराने ‘आकाश’ आणि एस ४०० क्षेपणास्त्र संरक्षण प्रणाली, एल–७० तोफा, झेयू–२३ एमएम, शिल्का प्रणाली आणि प्रगत ड्रोनविरोधी उपकरणे वापरली.

## सुगाव बु. शिवारात निळवंडेच्या कालव्यात बुडून तरुणाचा मृत्यू

**● अकोले । वीरभूमी–**

निळवंडे धरणाच्या उजव्या कालव्यात पोहायला गेलेल्या परखतपूर येथील तरुणाचा पाण्यात बुडून दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना आज दुपारी सुगाव बुद्रूक शिवारात घडली. या घटनेमुळे परखतपूर परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. गणेश भाऊसाहेब वाकचौरे (वय ४०, रा. परखरपुर, ता. अकोले) असे मयत झालेल्या युवकाचे नाव आहे. त्याच्या पश्चात आई, पत्नी, एक मुलगा व एक मुलगी असा परिवार आहे.



याबाबत अधिक माहिती अशी की, सदर युवक हा अमृतसागर दूध संघ अकोले येथे बॉयलर ऑपरेटर म्हणून सेवेत होता. निळवंडे धरणातून सध्या डाव्या व उजव्या कालव्यातून आवर्तन सुरू आहे. गणेश वाकचौरे हा युवक आपल्या मित्रासोबत पोहण्यासाठी कालव्यात गेलेला असताना त्याचा पाण्यात बुडून दुर्दैवी मृत्यू झाला. त्याची गाडी व कपडे हे परखतपूर येथील पाटाच्या कडेला सापडले. त्यामुळे ही घटना उघडकीस आली. त्याचा मृतदेह हा सायंकाळी पाण्यातून बाहेर काढला. त्याचा मृतदेह कोतूळ येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात हलवीण्यात आला आहे.उद्या शुक्रवारी त्याच्या सख्ख्या चुलत बहिणीचे लग्न होते .या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

# SPOT NEWS



## अनाधिकृत पोल्ट्री फार्म बंद करण्यासाठी बहुजन समाज पार्टीचे निवेदन

**● नगर । वीरभूमी–**

देवळाली प्रवरा नगर परिषदेच्या हद्दीत नागरिकांच्या आरोग्यास गंभीर धोका निर्माण करणाऱ्या अनधिकृत पोल्ट्री फार्म बंद करण्याची जोरदार मागणी बहुजन समाज पार्टी व स्थानिक ग्रामस्थांनी केली आहे. यासंदर्भात प्रभारी निवासी उपजिल्हाधिकारी अरुण उंडे यांना निवेदन देण्यात आले असून, जर त्वरित कारवाई झाली नाही, तर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे. यावेळी बहुजन समाज पार्टीचे जिल्हा प्रभारी सुनील ओहोळ, जिल्हा सचिव चंद्रकांत दोंदे, राहुरी तालुका अध्यक्ष संजय संसारे, महासचिव कैलास तोडगे, तालुका प्रतिनिधी अशोक तांबे, शहानवाझ शेख, अनिकेत कडू आदी उपस्थित होते. नगर परिषदेच्या हद्दीत गेल्या काही काळात अनेक पोल्ट्री फार्म अनधिकृतरित्या सुरू करण्यात आले आहेत. या फार्मना प्रशासनाची कोणतीही मान्यता नाही, तरीही स्थानिक अधिकारी दुर्लक्ष करत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. या पोल्ट्री फार्ममुळे परिसरात मोठ्या प्रमाणात दुर्गंधी, घाण, रोगराईचा प्रसार झाला आहे. मृत पक्षी आणि पोल्ट्रीमधील घाण अनियमितपणे टाकल्यामुळे मोकाट कुत्र्यांची संख्या वाढली आहे. हे कुत्रे नागरिकांवर हल्ले करत असून, बालकांच्या सुरक्षिततेवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या घाणीमुळे परिसरात माशा व डास वाढले असून, त्यामुळे साथीचे आजार पसरण्याचा धोका वाढला आहे. अनेक नागरिक आजारी पडत असून, त्यांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

## खंडाळा गावातील शेतकरी दरेकर यांचे खडी क्रेशर समोर आमरण उपोषण

**● नगर । वीरभूमी–**

अहिल्यानगर तालुक्यातील मु. पो. खंडाळा येथील खडी क्रेशर च्या धुळीमुळे तेथे राहणाऱ्या शेतकऱ्यांच्या शेतामध्ये धूळ जाऊन व खडी जाऊन फळबागाचे मोठे नुकसान झालेले आहे. त्यामुळे खडी क्रेशर मालकांनी शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याच्या मागणीसाठी खडी क्रेशर समोर आमरण उपोषण करताना शेतकरी सागर दरेकर, रमेश दरेकर आदी नुकसानग्रस्त शेतकरी उपस्थित होते. पुढे निवेदनात म्हटले आहे की, खंडाळा गावामध्ये खडी क्रेशर च्या परिसरात अनेक शेतकऱ्यांचे शेतजमिनी आहे व शेतकऱ्यांनी फळे बागे व अन्य शेती करत आहे मात्र या खडी क्रेशर मुळे सर्व शेतकऱ्यांचे पिकाचे व फळबागाचे नुकसान झालेले आहे या खडी क्रेशर संदर्भात अनेकदा तक्रारी करूनही शेतकऱ्यांना अद्यापही न्याय मिळाला नसून लोकशाहीच्या मार्गाने खडी क्रेशर समोर आमरण उपोषण सुरू करण्यात आले असून या खडी क्रेशर मुळे शेतकऱ्यांच्या फळबागाची नुकसान भरपाई मिळत नाही तोपर्यंत खडी क्रेशर बंद ठेवण्यात यावे व शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळाली नाही तर खडी क्रेशर कायमस्वरूपी बंद करण्यात यावे अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

# कृषी विभागाने शेतकऱ्यांना सर्वोतोपरी मदत करावी

## आ. मोनिकाताई राजळे । शेवगाव तहसील कार्यालयात खरीप हंगाम नियोजन आढावा बैठक

**● शेवगाव । वीरभूमी –**



योग्य नियोजन आणि व्यवस्थापन केल्याने पिकांची उत्पादकता वाढुन शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारणे करीता कृषी विभागाने पुढाकार घेऊन शेतकऱ्यांना मदत करावी. जादा दराने खत विक्री करणे, खताचा साठा करून ठेवणे, लिंकिंग करणे यावर प्रतिबंध घालावा. शासनाने दिलेल्या मार्गदर्शक सुचनांचे पालन करून शेतकऱ्यांना कृतीतुन सर्वो तोपरी मदत करावी, अशा सुचना आमदार मोनिकाताई राजळे यांनी यावेळी कृषी विभागाला दिल्या.

शेवगाव तहसील कार्यालयात खरीप हंगाम २०२५-२६ पुर्व नियोजन आढावा बैठक आमदार मोनिकाताई राजळे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली, यावेळी त्या बोलत होत्या. या बैठकीत राज्यातील कृषी उत्पादन, पिकांची विविधता आणि कृषी क्षेत्राच्या विकासासाठी आवश्यक उपाययोजनांवर यावर चर्चा झाली. आगामी हंगामात लागवडीसाठी आवश्यक बियाणे, खतांचा पुरवठा, तसेच संभाव्य नैसर्गिक आपत्तींचे व्यवस्थापन या संदर्भात सविस्तर आढावा घेण्यात आला. हवामानातील बदल लक्षात घेता, आपत्कालीन परिस्थितींसाठी पूर्वतयारीची रणनीती देखील मांडण्यात आली.

यावेळी तालुका कृषी अधिकार अंकुश टकले, नायब तहसीलदार दीपक कारखेले, कृषी अधिकारी राहुल कदम, ज्येष्ठ नेते बापुसाहेब भोसले, बापुसाहेब पाटेकर, भाजपा तालुकाध्यक्ष संजय टाकळकर, भिमराज सागडे, नगरसेवक महेश फलके, सागर फडके, गणेश कोरडे, गणेश रांधवणे, आशाताई गरड, कचरू चोथे, सुरेश नेमाणे, जगदीश धुत, संदीप खरड, शेवगाव कृषी विभागाचे कृषी अधिकारी, तालुक्यातील कृषी सेवा केंद्र चालक आदी मान्यवर उपस्थित होते.

शासनाच्या नियोजनानुसार शेतकऱ्यांना मुबलक प्रमाणात बियाणे व खतांचा पुरवठा होणार आहे. खतांचा वापर करतांना जमीनीचा पोत सुधारण्याची जबाबदारी आपलीच आहे. खतांचा योग्य वापर करावा. कृषी विभागाने शेतकऱ्यांना बियाणे व खतांचा वापर करण्याकरिता योग्य मार्गदर्शन करावे. पर्जन्यमापक यंत्रणा व्यवस्थित आहे का? याची खातरजमा करावी. पिकविमा बाबत शेतकऱ्यांची जनजागृती करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना विमा मिळवून देणेकरीता कृषी विभागाने पुढाकार घ्यावा, अशा सुचना यावेळी आमदार मोनिकाताई राजळे यांनी केल्या.

या बैठकीत तालुका कृषी अधिकारी अंकुश टकले यांनी कृषी विभागाच्या खरीप हंगामासाठी करण्यात आलेल्या नियोजनाची माहिती दिली. त्यांनी शेतकऱ्यांना आधुनिक शेती तंत्रज्ञानाचा वापर करण्याचे आणि हवामानावर आधारित शेती करण्यासह शेतकऱ्यासाठी असलेल्या विविध शासकीय योजनांची माहिती दिली आणि त्यांचा लाभ घेण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन कृषी अधिकारी वैष्णवी कदम यांनी केले तर प्रशांत टेकाळे यांनी आभार मानले.

## ह.भ.प. राधिकाताई खेमनर यांना राज्यस्तरीय धर्मभुषण पुरस्कार जाहीर

**● पाथर्डी । वीरभूमी–**

गरुड फाउंडेशनच्या वतीने दरवर्षी राज्यातील विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना राज्यस्तरीय पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. यावर्षी आध्यात्मिक धार्मिक व वारकरी संप्रदायात महीला वर्गात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या जिल्ह्यातील सुप्रसिद्ध महिला युवा किर्तनकार व समाज प्रबोधनकार हभप. राधिकाताई खेमनर यांना हा पुरस्कार जाहीर झाला आहे.



फाउंडेशनच्या वतीने जाहीर केलेल्या पत्रकात म्हटले आहे की, अध्यात्मिक व सामाजिक क्षेत्रात गेल्या काही वर्षात आपण करत असलेल्या उल्लेखनिय कार्याची दखल घेऊन, आपल्या कार्याचा गौरव व प्रोत्साहन देण्याच्या हेतूने आपणास राज्यस्तरीय धर्मभूषण पुरस्कार जाहीर करीत आहोत. हभप. राधिकाताई या आध्यात्मिक वारकरी क्षेत्रात मागील काही वर्षापासून महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातील विविध सामाजिक उपक्रमांना मार्गदर्शन करत आहेत. त्या महिला जनजागृती, देशभक्ती, समाज प्रबोधन, स्त्री शिक्षणाचे महत्व, गोरक्षा, बाल संस्कार, अंधश्रद्धा निर्मूलन, निसर्ग संवर्धन, जल संवर्धन अध्यात्म आदी विषयावर आपल्या किर्तनातून समाज प्रबोधनाचे प्रभावी कार्य करीत आहेत. गोशाळा चालवत आहेत. अत्यंत प्रभावी वकृत्वशैलीत, मधुर, रसाळ व ओघवती वाणी, साधी राहणी व ग्रामीण भागाशी व शेतकरी कुटुंबाशी त्यांची नाळ जोडलेली आहे. त्यांना यापूर्वीही अनेक राज्यस्तरीय पुरस्कार मिळालेले आहेत. हा पुरस्कार मिळाल्याने त्यांचे वारकरी संप्रदायासह विवीध क्षेत्रातून अभिनंदन होत आहे. लवकरच हा पुरस्कार राज्यातील विवीध क्षेत्रातील मान्यवराच्या उपस्थितीत सन्मानपूर्वक प्रदान करण्यात येणार आहे.

## इंदिरा नगरातील नागरी समस्यांसाठी शिवसेनेचे श्रीगोंदा नगरपरिषदेला निवेदन

### तात्काळ कारवाई न झाल्यास आंदोलनाचा इशारा

**● श्रीगोंदा । वीरभूमी–**



श्रीगोंदा नगरपरिषद हद्दीतील प्रभाग क्रमांक २ मधील इंदिरा नगर परिसरातील नागरी समस्यांच्या निराकरणासाठी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) यांच्यावतीने मुख्याधिकारी ओ. एस. जवक यांना निवेदन देण्यात आले. यावेळी शिवसेना उपजिल्हाप्रमुख बाळासाहेब दुतारे, सुरेश देशमुख, वनराज क्षिरसागर, संभाजी घोडके, शिवाजी समदडे, सागर खेडकर, बबन कवडे यांच्यासह शिवसैनिक, युवा सैनिक आणि परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

निवेदनात इंदिरा नगरातील नादुरुस्त व बंद अवस्थेतील पोलवरील स्ट्रीट लाइट्स चालू करणे, गटार लाईनचे चेंबर दुरुस्त करणे, गटाराची स्वच्छता करणे आणि अनेक दिवसांपासून बंद असलेली घंटागाडी सेवा त्वरित सुरू करणे यासह विविध मागण्या करण्यात आल्या. या समस्यांमुळे परिसरातील नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. शिवसेनेने तात्काळ कारवाईची मागणी करत, मागण्या पूर्ण न झाल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता मुख्याधिकारी कार्यालयात शिवसेना स्टाईलने ठिय्या आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. याप्रसंगी होणाऱ्या परिणामांची जबाबदारी नगरपरिषद प्रशासनावर राहील, असेही निवेदनात नमूद करण्यात आले.

या निवेदनावर परिसरातील असंख्य नागरिकांच्या सह्या आहेत. नागरिकांनीही प्रशासनाने त्वरित पावले उचलून मूलभूत नागरी सुविधा उपलब्ध कराव्यात, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

## जिल्हा न्यायालयात बदली व बढतीप्राप्त न्यायाधीशांचा गौरव

**● नगर । वीरभूमी–**

न्यायधीश म्हणून काम करताना त्या शहरातील भौगोलिक परिस्थिती व परिसरातील वातावरणाशी एकरुप होवून काम करावे लागते. या शहरात रुजू झाल्यापासून कोणी परके असल्याचे जाणवले नाही. हे शहर ऐतिहासिक असून, अनेक गोष्टी पाहण्यासारख्या आहेत. अनेक ऐतिहासिक घटनांशी जोडलेले हे शहर आहे. बार आणि बेंचच्या सहकार्याने पक्षकारांना न्याय मिळवून देण्याचे उकृष्टपणे काम होत असल्याचे प्रतिपादन जिल्हा सत्र न्यायाधीश अंजू शेंडे यांनी केले.

जिल्हा न्यायालयात कार्यरत असलेले न्यायधीश यांना बढती मिळाल्याबद्दल व बदली झाल्याबद्दल जिल्हा न्यायालय व अहमदनगर शहर बार असोसिएशनच्या संयुक्त विद्यमाने त्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी अध्यक्षीय भाषणात जिल्हा सत्र न्यायाधीश शेंडे बोलत होत्या. याप्रसंगी शहर वकील संघाचे अध्यक्ष ॲड. राजेश कातोरे, जिल्हा सरकारी वकील ॲड. सतीश पाटील, उपाध्यक्ष ॲड. वैभव आघाव आदी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

अध्यक्षीय सूचना वकील संघाचे सचिव ॲड. संदीप बुरके यांनी मांडली. त्याला अनुमोदन ॲड. विजय केदार यांनी दिले. प्रास्ताविकात ॲड. वैभव आघाव यांनी बार आणि बेंच सर्वसामान्यांना न्याय मिळवून देण्याच्या उद्देशाने एकमेकांना सहकार्य करुन काम करत आहे. विविध जिल्ह्यात बदली झालेले न्यायाधीशांची उत्तरोत्तर प्रगती व्हावी व न्यायदानाचे कार्य त्यांच्या हातून घडण्याची अपेक्षा व्यक्त केली.

या कार्यक्रमात जिल्हा न्यायाधीश श्रीमती एस. व्ही. सहारे, अतिरिक्त जिल्हा न्यायाधीश एम.एस. तिवारी, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव भाग्यश्री पाटील, बी. एम. कार्लेकर साहेब, वाय एम. तिवारी मॅडम, जी. डी. निर्मळे मॅडम, एस.एस. पारवे, एम. ए. देशमुख मॅडम, आय. एम. नाईकवाडी, श्रीमती एस. जी. अग्रवाल, एच. आर. जाधव मॅडम, एम. पी. पांडे, बी. बी. शेळके, डी. एम. झाटे, टी. एम. निराळे, कामगार न्यायालयातील न्यायाधीश देशपांडे, देशमुख, व्ही. बी. शेट्टी, पी. डी. यवतकर मॅडम या न्यायधीशांचा फेटे बांधून सन्मान करुन त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.

बारा असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. राजेश कातोरे म्हणाले की, जिल्हा न्यायालयाला २०० वर्षाचा इतिहास आहे. न्यायदान करुन लोकशाहीचा पाया मजबूत करण्याचे काम न्यायालयाच्या माध्यमातून सुरु आहे. बार आणि बेंचमध्ये सामंजस्याची भूमिका असलेले अहमदनगर बार हा सर्वोत्तम असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

न्यायाधीश भाग्यश्री पाटील यांनी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणासाठी वकील मंडळींचे विशेष सहकार्य मिळाले. खांद्याला खांदा लावून काम करण्याबरोबर दुःखात अश्रू पुसण्यासाठी देखील वकील मंडळी धावून आले. आत्मीयतेने माणसे कमविल्याचा आनंद होत असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी विविध न्यायधीशांनी मनोगत व्यक्त करुन वकील वर्गाशी स्नेहभाव जोडला गेला असून, काम करताना वकील मंडळींचे नेहमी सहकार्य मिळाले, कोणत्याही अडचणी आल्या नसल्याचे स्पष्ट केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ॲड. ज्योती हिमणे यांनी केले. आभार ॲड. अभिजीत देशमुख यांनी मानले. या कार्यक्रमासाठी विशेष सरकारी वकील ॲड. सुरेश लगड, ॲड. अनिता दिघे, ॲड. अनुराधा येवले, ॲड. लक्ष्मण कचरे, ॲड. रमेश कराळे, ॲड. संजय पाटील, ॲड. अजिंक्य काळे, ॲड. आनंद सुर्यवंशी, ॲड. सुजाता बोडखे, ॲड. प्रतिक्षा मंगलाराम, ॲड. स्वाती पाटील, ॲड. धनंजय वाघ, ॲड. अजित वाडेकर, ॲड. वृषाली तांदळे, ॲड. करुणा शिंदे, ॲड. रामेश्वर कराळे, ॲड. राजेश कावरे, ॲड. प्रिया खरात, ॲड. शशिकांत पाठक, ॲड. सुवर्णा ढापसे, ॲड. मुबीना जहागीरदार, ॲड. संदीप शेंदुरकर, ॲड. महेश काळे, ॲड. दिपाली झांबरे, ॲड. गौरव दांगट, ॲड. नितीन डुबे, ॲड. अजय इनामदार आदींसह वकील संघाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# शेवगाव बाजार समितीत खांदेपालट

## सभापतिपदी नानासाहेब मडके; उपसभापतिपदी रागिणी लांडे यांची निवड



**● शेवगाव । वीरभूमी–**

शेवगाव कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापती व उपसभापती यांनी आपल्या पदाचे राजीनामे दिल्यानंतर रीक्त जागेवर सभापतिपदी नानासाहेब बबनराव मडके, तर उपसभापतिपदी रागिणी सुधाकर लांडे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. निवडीनंतर नूतन पदाधिकाऱ्यांचा प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

बाजार समितीचे सभापती एकनाथ कसाळ व उपसभापती गणेश खंबरे यांनी सहायक निबंधक विजयसिंग लकवाल यांच्याकडे आपल्या पदाचे राजीनामे दिले होते. या राजीनाम्यानंतर रीक्त असलेल्या दोन्ही पदाच्या निवडीबाबत माजी आमदार डॉ. नरेंद्र घुले व माजी आमदार चंद्रशेखर घुले यांनी सर्व संचालकांची बैठक घेत सभापतिपदी गदेवाडी येथील नानासाहेब मडके तर उपसभापतिपदी ढोरजळगावशे येथील रागिणी लांडे यांची नावे जाहीर केली होती.

यानंतर बाजार समितीच्या सभागृहात सहायक निबंधक विजयसिंह लकवाल यांच्या अध्यक्षतेखाली सर्व संचालक मंडळाची बैठक बोलावण्यात आली होती. या बैठकीत ठरल्याप्रमाणे सभापतिपदासाठी नानासाहेब मडके यांच्या नावाची सूचना संचालक अशोक मेरड यांनी केली. त्यास संचालक जमीर पटेल यांनी अनुमोदन दिले. तर उपसभापतिपदासाठी रागिणी लांडे यांच्या नावाची सूचना संचालक हनुमान पातकळ यांनी केली, तर संचालक संजय कोळगे यांनी अनुमोदन दिले. दोन्ही पदासाठी प्रत्येकी एक अर्ज आल्याने दोन्ही निवडी बिनविरोध झाल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी लकवाल यांनी जाहीर केले. त्यांना सचिव अविनाश म्हस्के यांनी सहाय्य केले.

या बैठकीसाठी राजेंद्र दौंड, मनोज तिवारी, अनिल मडके, प्रदीप काळे आदीसह पंचायत समितीचे माजी सभापती अरुण लांडे, ज्ञानेश्वरचे संचालक काकासाहेब नरवडे, संचालक संजय कोळगे, ताहेर पटेल, कल्याण नेमाणे, घाडगे आदी उपस्थित होते. निवडीनंतर दोन्ही नूतन पदाधिकाऱ्याचा बाजार समितीच्यावतीने सत्कार करण्यात आला. निवडीनंतर नूतन पदाधिकारी यांनी बाजार समिती आवारातील लोकनेते मारुतरावजी घुले पाटील यांच्या पुतळ्याला अभिवादन केले.

या निवडीबद्दल दोन्ही नूतन पदाधिकाऱ्यांचे ज्ञानेश्वर साखर कारखान्याचे अध्यक्ष माजी आ. डॉ. नरेंद्र घुले, माजी आमदार चंद्रशेखर घुले, पंचायत समिती सभापती डॉ. क्षितिज घुले, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा राजश्रीताई घुले आदींनी अभिनंदन करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

SPOT NEWS



## भारतीय लष्कराच्या ऑपरेशन सिंदूरचे स्वागत करुन युवासेनेचा जल्लोष

**● नगर । वीरभूमी–**

भारतीय लष्कराने ऑपरेशन सिंदूर अंतर्गत पाकिस्तानातील दहशतवाद्यांच्या तळांवर हवाई हल्ला करून अनेक दहशतवाद्यांचा खात्मा केला. जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे घडलेल्या भ्याड दहशतवादी हल्ल्याचा बदला म्हणून ही कारवाई करण्यात आली. या पार्श्वभूमीवर एमआयडीसी परिसरात युवासेनेच्यावतीने जल्लोष साजरा करण्यात आला. युवासेनेने तिरंगा फडकावून परिसरात भारत माता की जय, वंदे मातरमच्या घोषणा दिल्या. पेढे वाटून आनंद साजरा करण्यात आला. देशप्रेमाचा उत्साह आणि लष्कराच्या शौर्याचे कौतुक करत अनेक कार्यकर्ते या जल्लोषात सहभागी झाले होते. यावेळी युवासेना जिल्हा प्रमुख योगेश गलांडे, आकाश कातोरे, उद्योजक वैभव शेटिया, नरेश शेळके, अमित बारवकर, शंकर शेळके, वैभव सुरवसे, असलम इनामदार, हर्षवर्धन देशपांडे, अजिनाथ क्षीरसाठ, स्वप्निल खराडे आदींची उपस्थिती होती. योगेश गलांडे म्हणाले की, दहशतवाद्यांनी पहलगाम येथे २६ निष्पाप भारतीय नागरिकांचा जीव घेतला, ही घटना पूर्ण देशासाठी वेदनादायक आहे. भारतीय लष्कराने अत्यंत धाडसी आणि ठोस कारवाई करत पाकिस्तानमधील दहशतवादी तळ उध्वस्त केले, त्यासाठी संपूर्ण देशवासियांना त्यांचा अभिमान आहे.

## साहित्यिक त्र्यंबकराव देशमुख यांना जीवन गौरव पुरस्कार जाहीर

**● नगर । वीरभूमी–**



मराठी साहित्य मंडळ (मुंबई) यांच्या वतीने अहिल्यानगर शहरातील सामाजिक कार्यकर्ते व साहित्यिक त्र्यंबकराव उर्फ बाळासाहेब देशमुख यांना राज्यस्तरीय सावित्रीबाई फुले जीवन गौरव साहित्य भूषण पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. फलटण येथे १६ मे रोजी होणाऱ्या तेराव्या अखिल भारतीय साहित्य संमेलनात उपस्थित मान्यवरांच्या हस्ते देशमुख यांना पुरस्कार प्रदान करण्यात येणार असल्याची माहिती संस्थेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. जयप्रकाश घुमटकर उर्फ कवी गोलघुमट यांनी दिली. बाळासाहेब देशमुख हे अहिल्यानगर जिल्ह्याचे मराठी साहित्य मंडळाचे अध्यक्ष आहेत. त्यांची आतापर्यंत श्रीक्षेत्र मांडवगण आणि सिद्धेश्वर दर्शन, आबा मास्तर, माऊंटन मॅन, संत आईसाहेब महाराज देशमुख आणि संत पळसेकर महाराज ही धार्मिक व सामाजिक विषयांवरील पुस्तके प्रसिद्ध झालेली आहेत. देशमुख यांना पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल विविध स्तरातून त्यांचे अभिनंदन होत आहे.

# श्रीगोंदा पोलिसांकडून भिंगाण दरोड्याची उकल

### तीन आरोपी अटक । चोरीचा माल हस्तगत

**● श्रीगोंदा । वीरभूमी–**

श्रीगोंदा तालुक्यातील भिंगाण येथे दि.२२ एप्रिल रोजी रात्री १ वाजण्याच्या सुमारास घडलेल्या दरोड्याच्या गुन्ह्याची श्रीगोंदा पोलिसांनी यशस्वीपणे उकल केली आहे. या प्रकरणी पोलिसांनी तीन आरोपींना शिताफीने अटक केली असून, चोरीस गेलेला ७५ हजार रुपये किमतीचा सोन्याचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की सौ. शैला भिवसेन तोंडे (वय ४०, रा. भिंगाण खालसा) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, दरोडेखोरांनी त्यांच्या घराच्या पडवीत झोपलेल्या फिर्यादीवर हल्ला केला. आरोपींनी त्यांचे हात पकडून, केस ओढून आणि चाकूने मारहाण करून गळ्यातील सोन्याचे अक्काबाई डोरले आणि मिनी गंठण असा ७५ हजार रुपये किमतीचा ऐवज बळजबरीने चोरला. फिर्यादीच्या पतींनी पत्नीला वाचवण्याचा प्रयत्न केला असता, दरोडेखोरांनी त्यांच्या डाव्या हातावर चाकूने वार करून गंभीर जखमी केले. याप्रकरणी श्रीगोंदा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.




या गुन्ह्याबाबत उपविभागीय अधिकारी विवेकानंद वाखारे, पोलीस निरीक्षक किरण शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली श्रीगोंदा पोलिसांनी गोपनीय माहितीच्या आधारे तपास सुरू केला. सापळा रचून पोलिसांनी तीन आरोपींना ताब्यात घेतले. अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये संकेत प्रताप गायकवाड (वय २०, रा. चिंभळे), वैभव नानासाहेब लबडे (वय २०, रा. घायपतवाडी) आणि सौ. चंदा किरण ताम्हाणे (वय ३७, रा. होली गल्ली, श्रीगोंदा) यांचा समावेश आहे. चौकशीदरम्यान, आरोपींनी हर्षद किरण ताम्हाणे आणि त्याच्या दोन ते तीन अनोळखी साथीदारांसह हा गुन्हा केल्याची कबुली दिली. पोलिसांनी आरोपींकडून चोरीस गेलेले सोन्याचे दागिने जप्त केले असून, फरार आरोपींचा शोध सुरू आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक राकेश ओला, अपर पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे, उपविभागीय पोलीस अधिकारी विवेकानंद वाखारे आणि पोलीस निरीक्षक किरण शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथकाचे पोलीस उपनिरीक्षक संपत कन्हेरे यांच्या नेतृत्वाखालील पथकाने केली. पथकात पो.ना. गोकुळ इंगावले, संग्राम जाधव, पोकॉ. संदीप शिरसाठ, संदीप राऊत, संदीप आजबे, रवी जाधव आणि प्रमिला उबाळे यांचा समावेश होता. पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक गणेश अहिरे करीत आहेत. श्रीगोंदा पोलिसांच्या या यशस्वी कारवाईचे नागरिकांकडून कौतुक होत आहे.

## माजी मंत्री मधुकरराव पिचड यांचे प्रवरा खोऱ्यात पाणी देण्याचे स्वप्न पूर्णत्वास : सुधाकर देशमुख

**● अकोले । वीरभूमी–**

तीव्र उन्हाळ्याच्या या दिवसात निळवंडे धरणाचे कालवे दुथडी भरून वाहत आहेत.नदी काठापासून डोंगरापर्यंतचा सर्व परिसर हिरवागार दिसत आहे. माजी मंत्री मधुकरराव पिचड यांचे अकोले तालुक्यात सर्वत्र पाणी देण्याचे स्वप्न प्रवरा खोऱ्यात पूर्णत्वास गेले याचा आनंद एक कार्यकर्ता म्हणून मला निश्चित आहे असे प्रतिपादन अकोले तालुका एज्युकेशन सोसायटीचे सेक्रेटरी सुधाकरराव देशमुख यांनी केले.



आज सुगाव बुदृक शिवरातून जाणाऱ्या निळवंडे कालव्याची पहाणी त्यांनी पत्रकारां समवेत केली. तेव्हा ते पत्रकारांशी संवाद साधताना बोलत होते.

निळवंडे उजव्या कालव्याला प्रथम पाणी सुटले तेव्हा त्याची पहानी माजी मंत्री, जलनायक स्व.पिचड साहेबांनी याच पुलाजवळ उभे राहून केली होती अशी आठवणही त्यांनी सांगितली.

निळवंडे धरणाला चार कालवे काढून त्यामधून कालव्या खालील आणि वरच्या भागाला पाणी मिळावे हे स्वप्न माजी मंत्री मधुकरराव पिचड यांनी पाहिले होते. भर उन्हाळ्यात अनेक ठिकाणी प्रथमच पाणी मिळाले आहे. निळवंडे कालव्यामुळे गावांना जोडणारे रस्ते झाले.गावांमधील अंतरही कमी झाले आहे. शेतकऱ्यांना शेतमालाच्या वाहतुकीसाठी कालव्या लगतच्या या रस्त्यांचा उपयोग होत आहे. काही ठिकाणी कालव्यां वर छोटे छोटे पूल तयार झाले आहेत, होणार आहेत. त्यामुळे त्या परिसरातील वाडीवस्त्यावर जाणे येणे सुकर होणार आहे, असे ते म्हणाले.

माजी मंत्री मधुकरराव पिचड यांनी कालव्यांच्या बाबतीत अतिशय विचार पूर्वक व दूरदृष्टी ठेवून निर्णय घेतले त्याचा लाभ येथील माणसांना होत असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी माजी प्राचार्य प्रकाश टाकळकर, अमोल वैद्य, रोटरी क्लबचे अध्यक्ष विद्याचंद्र सातपुते आदी उपस्थित होते.

## मोतीलालजी फिरोदिया अखिल भारतीय खुली क्लासिकल बुद्धिबळ स्पर्धेचा शुभारंभ

**● नगर । वीरभूमी–**

अखिल भारतीय मोतीलालजी फिरोदिया खुल्या बुद्धिबळ स्पर्धेचे उद्घाटन अ.नगर जिल्हा बुद्धिबळ संघटनेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया व आंध्र प्रदेश चा इंटरनॅशनल मास्टर कृष्णा तेजा ह्यांचा हस्ते पटावर चाल देऊन करण्यात आले व स्पर्धेच्या उद्घाटनाच्या वेळी आपल्या उद्घाटनपर भाषणात अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया यांनी बुद्धिबळा साठी अहिल्यानगर जिल्हा बुद्धिबळ संघटना कटिबद्ध राहील आम्ही लौकरच राष्ट्रीय पंच परीक्षा, बीलो १६०० बुद्धिबळ स्पर्धा असे नवनवीन उपक्रम राबविण्याचा मानस व्यक्त केला व अहिल्यानगर जिल्ह्यात बुद्धिबळ स्पर्धेमुळे जास्तीत जास्त ग्रँडमास्टर तयार होणार असल्याची देखील त्यांनी भावना व्यक्त केली. यावेळी आंध्र प्रदेश चा इंटरनॅशनल मास्टर कृष्णा तेजा यांनी बुद्धिबळ स्पर्धे च्या नियोजना साठी अहिल्यानगर जिल्हा बुद्धिबळ संघटनेचे आभार व्यक्त केले व दर्जेदार स्पर्धा भरवल्याबद्दल त्यांचे कौतुक केले.

या वेळी सचिव यशवंत बापट, खजिनदार सुबोध ठोंबरे, विश्वस्त श्याम कांबळे, पारुनाथ ढोकळे, प्रकाश गुजराथी, नवनीत कोठारी, दत्ता घाडगे, चेतन कड, किरण सरोदे, अनुराधा बापट, शुभदा ठोंबरे, डॉ स्मिता वाघ, रोहिणी आडकर. आंतरराष्ट्रीय पंच प्रवीण ठाकरे, पवन राणे, शार्दुल तापसे, देवेंद्र ढोकळे, प्रशांत गंगेकर, विष्णू कुड्रे, स्वप्नील भुंगुरकर, सुनील जोशी, मनीष जसवानी आदीसह खेळाडू पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

स्पर्धेचे प्रस्ताविक सचिव यशवंत बापट यांनी केले. स्पर्धेमध्ये उत्कृष्ट खेळाडू व सर्वात ज्येष्ठ खेळाडू व सर्वात लहान वयाचा खेळाडूंचे सत्कार देखील करण्यात आले या स्पर्धेचे सूत्रसंचालन पारूनाथ ढोकळे यांनी केले व आभार सुबोध ठोंबरे यांनी मांनले.

# महिला प्रवाशाला आर्थीक मदत करणाऱ्या महिला वाहकाचा सत्कार

### पाथर्डी आगराच्या महिला वाहकाने छत्रपती संभाजीनगर एसटी प्रवासात घरी पैसे विसरलेल्या महिला प्रवाशाला केली होती मदत

**● पाथर्डी । वीरभूमी–**

गाडीत बसलेल्या आर्थिक अडचणीत सापडलेल्या गरजू प्रवासी महिलेला आगारातील महिला वाहकाने पदर मोड करत केलेली मदत लाख मोलाची ठरली. प्रवास संपल्यावर दोघींनीही साश्रू नयनांनी परस्परांचा घेतलेला निरोप समाज माध्यमातून राज्यभर गाजला. या वैशिष्ट्यपूर्ण कार्याबद्दल आज आगारामध्ये वाहकाचा गौरव भावनिक वातावरणात संपन्न झाला.

याबाबत अधिक माहिती अशी की सोमवारी सकाळी पाथर्डी आगारातून संभाजीनगर गाडी सुटते. लग्न तिथीमुळे गाडीला मोठी गर्दी होती. अत्यंत घाईगडबडीत आलेल्या महिला प्रवाशाला गाडी सुटल्यानंतर आपला मोबाईल व पैशाची पर्स घरी विसरल्याचे लक्षात आले. छत्रपती संभाजीनगरच्या शासकीय रुग्णालयात अत्त्यवस्थ असलेल्या नातेवाईकाच्या उपचारासाठी पैसे घेण्यासाठी संबंधित महिला पाथर्डी ला आली होती . महिलेच्या डोळ्यात पाणी होते. अत्यंत असाह्य व हताश पणे डोळ्यातून घळाघळा वाहणारी पाणी संबंधित महिला रोखू शकत नव्हती. शेजारी बसलेल्या प्रवाशाने याबाबत चौकशी केली तर त्यांनी सांगितले, मला अत्यंत तातडीने संभाजीनगरच्या घाटी रुग्णालयात जायचे आहे. माझे पती अत्यवस्थ आहेत. या गोंधळात माझ्याकडून पैशाचे पाकीट घरी विसरले. माझ्याकडे मोबाईल नाही. याची जाणीव असतानाही मी बस मध्ये बसले. त्यानंतर संबंधित प्रवाशाने गाडीतील वाहक राधा आबुज यांना या महिलेची कहाणी सांगितली. महिलेच्या चेहऱ्याकडे बघून स्त्री सुलभ ममत्व जागृत होत कर्तव्य भावनेने संबंधित वाहक महिलेने स्वतःच्या खिशातील पैसे काढत संभाजीनगरचे तिकीट दिले. तिकीट हातात पडल्यानंतर महिलेने डोळ्यातील अश्रूंना पुन्हा वाट करून दिली. सर्वांसमोर ती महिला वाहक महिलेविषयी कृतज्ञतेचे भाव व्यक्त करत रडत होती. संबंधित महिला प्रवासी वाहकाकडे मोबाईल नंबरची मागणी करत मी घरी गेल्यावर तुमचे पैसे पाठवून देईल असे म्हणत होती., तर वाहक महिलेने तुमच्या ठिकाणी माझी मोठी बहीण असती तर तिचे पैसे मी घेतले असते का असा सवाल करत राहू द्या.

तुमच्या मिस्टरांना ईश्वर लवकर बरे करो अशी प्रार्थना मी करते असे सांगितले. दोघींमध्ये हा संवाद अत्यंत भावुक नजरेने सर्वच प्रवासी न्याहाळत होते. बिडकीन च्या पुढे गाडी गेली असता गाडीमधील बुकिंग पूर्ण झाल्यावर संबंधित महिला वाहकाने प्रवाशांचे उरलेले राहिलेले सुटे पैसे देखील जागेवर जाऊन पोहोच केले. नंतर त्यांनी महिला प्रवाशाकडे येत सविस्तर चौकशी केली. सर्व परिस्थिती लक्षात आल्यावर वाहक अबुज यांनी खिशातून आणखी पन्नास रुपयाची नोट काढत महिलेच्या हातात दिली. मी संभाजीनगरला काही दिवस होते. बस स्थानकापासून हॉस्पिटल लांब आहे, तुम्ही कसे जाणार, रिक्षा करून जा. असे म्हणत पन्नास रुपये आणखी दिले. वाहकाच्या रूपाने मला परमेश्वर भेटला असे म्हणत तिने आबुज यांना घट्ट मिठी मारली. गाडीतील काही प्रवासी सुद्धा भावनिक झाले होते. ही पोस्ट समाज माध्यमांमध्ये व्हायरल झाल्यानंतर राज्यातून हजारोंच्या संख्येने संबंधित वाहककाचे कौतुक करणारे मेसेज मिळाले. परिवहन मंडळाच्या जिल्हास्तरीय व प्रदेशस्तरीय वरिष्ठ अधिकाऱ्यांनी कौतुक केले. आमदार मोनिका राजळे यांनी, माझ्या कार्यक्षेत्रातील खऱ्या अर्थाने तालुक्याचे व परिवहन मंडळाचे आयकॉन असलेली महिला अशा शब्दात गौरव करत त्यांचे अभिनंदन केले. आज आगारामध्ये सोलापूर परिवहन विभागाचे विभागीय



वाहतूक अधीक्षक परशुराम नकाते, सोलापूर विभागीय कार्मिक वर्ग अधिकारी मालनताई बनसोडे, आगार प्रमुख अरिफ पटेल, प्रवासी संघटनेचे अध्यक्ष अविनाश मंत्री, सरचिटणीस मुकुंद गर्जे यांचे उपस्थितीत अत्यंत भावपूर्ण वातावरणामध्ये वाहक राधा अबुज यांचा गौरव करण्यात आला.

यावेळी सर्व कर्मचाऱ्यांनी अबुज यांचे समोर उभे राहत निःशब्द होऊन फक्त टाळ्या वाजवत आपल्या कर्मचाऱ्याविषयी आदरभाव व्यक्त केला. यावेळी बोलताना आगार प्रमुख पटेल म्हणाले, राधा अबुज या आगारातील अत्यंत कर्तव्यदक्ष व शिस्तप्रिय वाहक आहेत. त्यांच्या अशा सेवाभावी कार्याने संपूर्ण राज्याच्या एसटीच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे. अशा कर्मचाऱ्यांचा महामंडळाला गौरव व अभिमान वाटतो. प्रवासी संघटना आमदार मोनिका राजळे व विविध कार्यकर्त्यांनी या कृत्याची घेतलेली दखल सर्वच कर्मचाऱ्यांना प्रेरणा देणारी ठरली आहे. सत्काराला उत्तर देताना अबूज म्हणाल्या, यापूर्वीही मी अशा पद्धतीची अनेकांना मदत केली. आमच्या घरातच देवधर्म व समाजकार्याची संस्कार आहेत. मी कोठेही कधीही केलेल्या सत्कर्माची वाचता केली नाही. मला ते आवडत नाही. मात्र एका प्रवाशाने या सत्कर्मा मध्ये केलेली मध्यस्थी व त्यांनीच त्याचे चित्रीकरण करत केलेली पोस्ट वाचून मला कळाले. प्रवासामध्ये असे अनेक प्रसंग येतात. चेहऱ्यावरून माणसे ओळखू येतात. अत्त्यवस्थ अवस्थेत असलेल्या पतीला लवकर आराम मिळवा म्हणून संबंधित महिला घरी पैसे नेण्यासाठी आली होती. तिच्या डोळ्यातून घळाघळा वाहणारे अश्रू तिच्या असहाय्यतेची साक्ष देत होते. योग्य व्यक्तीला योग्य वेळी मदत झाल्याबद्दल मलाही खूप समाधान वाटले. एसटीचे हेच वैशिष्ट्य आहे, सर्वसामान्य माणूस एसटीला दैवत मानतो व आम्ही प्रवाशांना दैवत मानतो. ही सेवा म्हणजे ईश्वराची सेवा हे असे त्यांनी सांगितले.

# जागेच्या पाहणीसाठी एमआयडीसीचे अधिकारी कोपरगावात

## बेरोजगार युवकांच्या आशा पल्लवित । आ. आशुतोष काळे यांनी दिलेला शब्द पुर्णत्व करण्याच्या मार्गाने

**● कोपरगाव । वीरभूमी-**
मतदार संघातील बेरोजगार तरुणाईला मतदार संघातच रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात यासाठी कोपरगाव शहरात एमआयडीसी व्हावी यासाठी आ.आशुतोष काळेंचा पाठपुरावा सुरु आहे. त्याबाबत कोपरगाव शहरातील जागेच्या पाहणीसाठी एमआयडीसीच्या अधिकाऱ्यांनी गुरुवार (दि.०८) रोजी पाहणी केली आहे.

कोपरगाव मतदार संघाच्या विकासाला आकार देणाऱ्या आ.आशुतोष काळे यांनी मतदार संघातील जनतेला दिलेल्या विकास कामांच्या वचनाबरोबरच बेरोजगारीचा प्रश्न कायमचा निकाली काढण्यासाठी मतदार संघात एमआयडीसी उभारणार असल्याचे सांगितले होते. दिलेला शब्द पूर्ण करण्यासाठी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजितदादा पवार यांच्या सहकार्यातून त्यांचा अविरतपणे पाठपुरावा सुरु आहे.

मागील वर्षी दसऱ्याच्या शुभ मुहूर्तावर सावळीविहिर-सोनेवाडी शिवारात शिर्डी एम.आय.डी.सी. व डिफेन्स क्लस्टरचा भूमिपूजन समारंभ महसूलमंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली व उद्योगमंत्री ना. उदयजी सामंत यांच्या शुभहस्ते संपन्न झाला होता. त्यावेळी आ.आशुतोष काळे यांनी कोपरगाव शहरालगत असलेल्या औद्योगिक वसाहत येथील जिल्हा उद्योग केंद्राच्या मालकीची ७१.७५ हेक्टर, डेअरी पोल्ट्री अँड ब्रिडिंग फार्मचे मालकीची ८६.४० हेक्टर व ॲग्रीकल्चर कोपरगांव कॅटल ब्रिडिंग सेंटर फार्मचे मालकीची १५.१९ हेक्टर अशी एकूण १७३.३४ हेक्टर (४३३ एकर) जागा उपलब्ध असून सदरची जागा एम.आय.डी.सी.कडे वर्ग करून त्याठिकाणी उद्योग व्यवसाय सुरु करण्याची घोषणा करावी अशी अपेक्षा उद्योगमंत्री ना. उदय सामंत यांच्याकडे व्यक्त केली होती. त्या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देत महसूलमंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांनी एमआयडीसीसाठी ४३३ एकर जागा विनामुल्य देण्याचे जाहीर करून लवकरच मंजुरी देणार असल्याची ग्वाही आ. आशुतोष काळेंना दिली असता उद्योगमंत्री ना. उदयजी सामंत यांनी देखील मागे न राहता महसूल मंत्र्यांनी जागा देण्याचा निर्णय घेतला आहे त्यामुळे मी देखील कोपरगावात एमआयडीसी उभारण्याची जबाबदारी घेत असल्याचे त्यावेळी जाहीर केले होते.

त्यानंतर २०२४ च्या विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात देखील आ.आशुतोष काळे यांनी पशुसंवर्धन विभागाच्या मालकीच्या जागेवर उद्योगमंत्री ना.उदयजी सामंत यांनी एमआयडीसी उभारण्यासाठी हिरवा कंदील दिला असून सदरची जागा तातडीने एमआयडीसीकडे त्वरित वर्ग करावी अशी मागणी केली होती. व आपला पाठपुरावा सुरूच ठेवला होता. त्या पाठपुराव्यातून एमआयडीसी उभारणीला चालना मिळत होती. व



गुरुवार (दि.०८) रोजी एमआयडीसीच्या महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे प्रादेशिक अधिकारी गणेश राठोड, क्षेत्र व्यवस्थापक दिलीप काकडे, प्रमुख भूमापक फुलचंद कातकडे आदी अधिकाऱ्यांनी कोपरगाव शहरातील जागेची पाहणी केली आहे. त्यामुळे बेरोजगार युवकांच्या आशा पल्लवित झाल्या असून एकदा हाती घेतलेले काम पूर्ण होईपर्यंत सोडायचेच नाही असा स्वभाव असलेल्या आ. आशुतोष काळेंच्या प्रयत्नातून सोनेवाडी-सावळीविहीर बरोबरच कोपरगाव शहरात देखील लवकरच एमआयडीसी उभी राहणार असल्याचे संकेत मिळत आहेत. यावेळी जागा पाहणीसाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## अगस्ति संस्थेचे १२ वी परीक्षेत घवघवीत यश



**● अकोले । वीरभूमी-**
येथील श्री अगस्ति एज्युकेशन सोसायटीच्या उच्च माध्यमिक विद्यालयाच्या १२ वीच्या बोर्ड परीक्षेत कला व विज्ञान शाखेचा निकाल समाधानकारक लागला असून विद्यार्थ्यांनी या परीक्षेत घवघवीत यश मिळवत संस्थेची निकालाची परंपरा कायम राखली आहे. संस्थेच्या अगस्ति माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय अकोले येथील कला शाखेचा निकाल ८२ टक्के लागला असून विद्यालयात गुणानुक्रमे प्रथम कडाळी संदीप शिवाजी ७५.१७, द्वितीय दराडे शैलेंद्र पाटीलबा ४९.६७, तृतीय जाधव तुषार निवृत्ती ४७.१७ टक्के गुण प्राप्त केले. तर संस्थेच्या सह्याद्री उच्च माध्यमिक विद्यालयाचा कला शाखेचा निकाल ९० टक्के लागला असून विद्यालयात गुणानुक्रमे प्रथम कु. वायळ प्रमिला मिनानाथ ७५ %, द्वितीय कु. गोंदके गायत्री रोहिदास ६७.८३ , तृतीय वायळ वैभव गोविंद ६५.६७ टक्के तसेच येथील विज्ञान शाखेचा निकाल १०० टक्के लागला असून गुणानुक्रमे प्रथम कु मोताळे सृष्टी परशुराम ८३.८३, द्वितीय कु हासे स्वरा चंद्रशेखर ८३%, तृतीय कु गीते स्नेहा अशोक ७१.१७% इतका लागल्याने आनंद व्यक्त होत आहे.

संस्थेच्या अढळा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा कला शाखेचा निकाल ८५.११ टक्के असून विद्यालयात गुणानुक्रमे प्रथम कु पारधी आरती हौशीराम ६९.१७%, द्वितीय खडके संदीप कैलास ६४.५०%, तृतीय मधे उमेश युवराज ६३.३३% इतका लागला असल्याने समाधान व्यक्त होत आहे. संस्थेचे संस्थापक सेक्रेटरी गुरुवर्य बा ह नाईकवाडी तथा बाबा यांनी ग्रामीण भागातील बहुजनांची मुले-मुली अधिक शिक्षित व्हाव्यात म्हणून संस्थेच्या विद्यालयाची संख्यात्मक वाढ करण्याऐवजी गुणात्मक वाढ होण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले व त्याच पार्श्वभूमीवर बाबांच्या तसेच कै दुर्गाबाई नाईकवाडी तथा आई यांनी संस्कारित केलेल्या आदर्शांवर सर्वच विद्यालयातील शिक्षक संस्था पदाधिकारी यांचे मार्गदर्शनाखाली हा वसा पुढे नेण्याचे काम करीत आहेत. संस्थेच्या वतीने संस्थेच्या सेक्रेटरी शैलजा पोखरकर, कार्याध्यक्ष शिरीष नाईकवाडी, सतीश नाईकवाडी, संदीप नाईकवाडी यांचेकडून अगस्ति माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य शिवाजी धुमाळ, उपमुख्याध्यापक प्रकाश सोनवणे, पर्यवेक्षक संजय शिंदे, मंगेश खांबेकर, सह्याद्री विद्यालय ब्राह्मणवाडा विद्यालयाचे प्राचार्य सुनिता शेलार, पर्यवेक्षक तात्यासाहेब दौंड, अढळा विद्यालयाचे प्राचार्य सी. एम. सहाणे व त्यासर्व विद्यालयातील सर्व विषयांचे मार्गदर्शक शिक्षक व विद्यार्थ्यांवर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

# आंबिकानगर आणि गरिमानगरी भागातील प्रलंबित ड्रेनेज व रस्त्याच्या कामांबाबत नागरिकांचा संताप

## दहा दिवसांत तोडगा न निघाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा

**● कोपरगाव । वीरभूमी-**
शहरातील आंबिकानगर, गरिमानगरी वॉर्ड क्रमांक ५ मधील नागरिक गेल्या दोन वर्षांपासून मूलभूत नागरी सुविधांपासून वंचित आहेत. रस्ते, ड्रेनेज, गटार, लाईटिंग आदी कामे दीर्घकाळापासून रखडलेली असून, वारंवार विनंत्या करूनही नगरपरिषदेने याकडे दुर्लक्ष केले आहे. नागरिकांनी पुन्हा एकदा एकत्र येत कोपरगाव नगरपरिषद मुख्याधिकारी यांना निवेदन सादर केले असून, लवकरात लवकर कामे मार्गी लावावीत, अशी मागणी केली आहे.पावसाळा तोंडावर असताना या समस्या सुटणे आवश्यक असल्याचे मानले जाते आहे.



आमदार आशुतोष काळे यांचा दोन दिवसांपुर्वी जनता दरबार हा केवळ औपचारिकता होता.सद्या नगरसेवक आणि पदाधिकारी यांचा कार्यकाळ संपला असल्याने गेले अनेक कालावधी जनतेच्या मूलभूत सुविधा प्रशासक काळात देखील सोडविण्यात आमदार महोदयांना पूर्णतः अपयश आले आहे. शहराला होणारा पाणीपुरवठा गाळमिश्रीत आणि उशिराने होत असल्याने हेच का जनतेच्या मतांचे फलित असा प्रश्न निर्माण होतो आहे.

मुख्यतः या भागात गटारी नसल्यामुळे पावसाचे पाणी साचते, यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. अनेकदा अपघात होण्याच्या घटना घडल्या असून, पथदिवे नसल्यामुळे अंधारात वावरणे कठीण झाले आहे. याशिवाय, महिलांना व वृद्धांना देखील मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. नागरिकांनी स्पष्टपणे सांगितले आहे की, वारंवार निवेदन देऊनही कामे न केल्यास तीव्र आंदोलन करण्यात येईल.

प्रशासनाने यापूर्वी दिलेल्या आश्वासनांची अंमलबजावणी केली नाही. त्यामुळे नागरिकांचा संयम सुटत असून, त्यांनी आता ठाम भूमिका घेतली आहे. निवेदनात नमूद केले आहे की, जर पुढील १० दिवसांत रस्ते व ड्रेनेजची कामे सुरू झाली नाहीत, तर नागरिक रस्त्यावर उतरून आंदोलन छेडतील. हा विषय केवळ नागरी सुविधांचा नसून, नागरिकांच्या सुरक्षिततेचा व आरोग्याचा आहे. प्रशासनाने तातडीने योग्य ती पावले उचलून कामे सुरू करावीत, अन्यथा याची जबाबदारी प्रशासनावरच राहील.

यावेळी जगदीश मोरे, संदीप चोळके, अनिल गोडसे, महेश पवार, एकनाथ झाबरे, राजू यादव, नितीन गिरमे, योगेश शिरसे, तुषार जेजुरकर, अंकुश शिरसे, शिवाजी औताडे, संजय वाघ, धर्मा आव्हाड, सागर दळवी, सतीश गाडे, सुधाकर शेळके, मच्छिंद्र गोर्डे, ठोंबरे साहेब, संदीप राऊत, मुक्तार पठाण, रामनाथ शिंदे, इसाकभाई तांबोळी आदींसह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भारतीय जैन संघटनेच्या जलप्रचार रथाचा पाथर्डीत प्रारंभ

**● पाथर्डी । वीरभूमी-**
पाथर्डी तालुक्यात राबविण्यात येत असलेल्या गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार या योजनेच्या जनजागृतीसाठी भारतीय जैन संघटनेने तयार केलेल्या जलप्रचार रथाचा व अभियानाचा प्रारंभ आज सकाळी दहा वाजता प्रांताधिकारी प्रसाद मते, नायब तहसीलदार दिग्विजय पाटील यांच्या हस्ते तहसील कार्यालयाच्या प्रांगणात नारळ वाढवून व रथाला हिरवा झेंडा दाखवून करण्यात आला.

यावेळी प्रांताधिकारी प्रसाद मते, नायब तहसीलदार दिग्विजय पाटील यांच्यासह संघटनेचे राज्य कार्यकारणी सदस्य विश्वजीत गुगळे, तालुकाध्यक्ष अमोल पटवा, जैन श्रावक संघाचे अध्यक्ष सुभाष चोरडिया, जेष्ठ कार्यकर्ते उत्तमचंद कर्नावट, प्रा. संतोष चोरडिया, समन्वयक आदीनाथ पवार आदी उपस्थित होते.

याप्रसंगी प्रांताधिकारी मते म्हणाले, गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार, ही महाराष्ट्र शासनाची योजना आहे. ही योजना गावागावात शेतकऱ्यांपर्यंत पोहोचण्यासाठी, तसेच मागणी अर्ज निर्माण करण्यासाठी




भारतीय जैन संघटना सज्ज झाली आहे. या योजनेचा फायदा तालुक्यातील सर्व गावांनी घेऊन, सरपंचांनी व शेतकऱ्यांनी ऑनलाइन अर्ज भरावेत.

तर राज्य कार्यकारिणी सदस्य विश्वजीत गुगळे म्हणाले की, संघटनेने तयार केलेल्या पोस्टर्स, माहिती पत्रकामध्ये क्यूआर कोड दिला असून, तो स्कॅन केल्यावर योजनेची सर्व माहिती व अर्जही डाउनलोड करता येईल.

तलावातील गाळ काढण्याचे काम आता ग्रामपंचायत करू शकेल. यासाठीचा निधी जिल्हाधिकाऱ्यांकडे आला आहे. तसेच तलावातील गाळ शेतात टाकण्यासाठी अल्प भूधारक, अत्यल्प भूधारक विधवा, विकलांग व आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांसाठी शासनाकडून अनुदान मिळणार आहे. यामुळे शेतकऱ्यांची जमीन सुपीक होणार असुन तालुक्यातील जलस्त्रोतांचे खोलीकरण झाल्याने पाणीसाठा व पाणी पातळी वाढणार आहे. हा रथ गावागावात जाऊन योजनेचा प्रचार प्रसार व जनजागृती करणार आहे. भारतीय जैन संघटना व महाराष्ट्र शासन यांच्यात सामंजस्य करार झाला असून हा रथ प्रत्येक गावात जाणार आहे. यासाठी बीजेएस चे कार्यकर्ते ग्रामपंचायत शेतकरी व प्रशासनाला सहकार्य करणार आहेत. या योजनेचा सर्व सामान्य शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा. सुत्रसंचलन करुन आभार अमोल पटवा यांनी मानले.

## 'ऑपरेशन सिंदूर' भारताच्या धैर्याचे आणि सामर्थ्याचे प्रतीक :आ. आशुतोष काळे

**● कोपरगाव । वीरभूमी-**
पहलगाम येथे पर्यटकांवर करण्यात आलेल्या दहशतवादी भ्याड हल्ल्यात २६ निरपराध पर्यटकांना आपला जीव गमवावा लागला होता त्याचा बदला भारताने 'सिंदूर ऑपरेशन' राबवून घेतला आहे. भारतीय हवाई दल आणि लष्कराचे संयुक्त ऑपरेशन असलेल्या भारतीय सैन्याची ही कामगिरी अभिमानास्पद आहे. 'ऑपरेशन सिंदूर' द्वारे दहशतवाद्यांना सडे तोड प्रत्युत्तर दिले असून 'ऑपरेशन सिंदूर' भारताच्या धैर्याचे आणि सामर्थ्याचे प्रतीक असल्याचे आ.आशुतोष काळे यांनी म्हटले आहे.



ते म्हणाले की, आपला भारत देश आता हल्ले सहन करणारा देश राहिला नाही तर प्रतिउत्तर देणारा हा नया भारत आहे. त्यामुळे गरज पडल्यास निर्णायक कठोर पाऊल उचलून घरात घुसून मारणारा देश बनला आहे. 'सिंदूर ऑपरेशन' राबवून दहशतवाद्यांना आणि त्यांच्या पाठीराख्यांना स्पष्ट इशारा देण्यात आला आहे.भारताच्या सीमा आणि नागरिकांच्या सुरक्षेबाबत कोणतीही आगळीक यापुढे सहन केली जाणार नाही. दहशतवादी हल्ल्याचा केवळ निषेध करून थांबनार नाही तर एका गोळीचे उत्तर मिसाईल ने देण्यात येईल. त्यामुळे यापुढे कोणीही आपल्या देशाकडे नजर वर करून पाहणार नाही.

'सिंदूर ऑपरेशन' यशस्वीपणे राबविणारे भारतीय शूर सैनिकांचा सार्थ अभिमान आहे. 'सिंदूर ऑपरेशन' राबविण्याचा निर्णय घेणारे देशाचे पंतप्रधान मा.नरेंद्रजी मोदी, गृह मंत्री मा.अमितजी शहा, संरक्षण मंत्री मा.राजनाथजी सिंह यांचे अभिनंदन.

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक- महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर- ४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक- महादेव दळे, पत्ता- कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com